दिनेश
बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे    सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १८३ । बुधवार ८ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322

## न्यायालयीन लढाईतही खासदार नीलेश लंके यांचा विजय

### औरंगाबाद खंडपीठाने निवडणूक याचिका फेटाळली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर लोकसभा मतदारसंघासाठी झालेल्या निवडणुकीत मिळालेल्या विजयावर दाखल करण्यात आलेली निवडणूक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळून लावत खासदार नीलेश लंके यांना मोठा दिलासा दिला आहे. या निर्णयामुळे निवडणुकीतील विजयासोबतच न्यायालयीन लढाईतही लंके यांनी आपली बाजू भक्कम सिद्ध केली आहे.

१३ मे २०२४ रोजी पार पडलेल्या मतदानानंतर ४ जून २०२४ रोजी जाहीर झालेल्या निकालात खासदार नीलेश लंके यांनी ६,२४,७९७ मते मिळवत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांचा २८,९२९ मतांनी पराभव केला होता. त्यानंतर १८ जुलै २०२४ रोजी डॉ. सुजय विखे यांनी , १९५१ अंतर्गत निवडणूक याचिका दाखल करून या निकालाला आव्हान दिले होते.



या प्रकरणात समन्स मिळाल्यानंतर खासदार नीलेश लंके यांनी २१ नोव्हेंबर २०२४ रोजी .१३ (.. .३४/२०२४) अर्ज सादर केला. सदर अर्ज मधील कलम ८३ व ८६(१) तसेच , १९०८ मधील ७ ११ ()() अंतर्गत दाखल करण्यात आला होता. या अर्जाद्वारे संबंधित निवडणूक याचिका कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य नसल्यामुळे ती फेटाळून लावावी, अशी मागणी करण्यात आली होती.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती किशोर सी. संत यांनी या प्रकरणातील सर्व बाजूंचे युक्तिवाद सखोलपणे ऐकून घेतले. खासदार लंके यांच्या वतीने ॲड. प्रमोद पाटील यांनी प्रभावी मांडणी केली. त्यांना ॲड. राहुल जोंधळे, ॲड. राहुल तेमक, ॲड. श्याम सोलंके आणि ॲड. राहुल झावरे यांनी सहकार्य केले.

अखेर दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी न्यायालयाने निकाल देत खासदार नीलेश लंके यांचा अर्ज मंजूर केला आणि डॉ. सुजय विखे यांची .१/२०२४ ही कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य नसल्यामुळे फेटाळून लावली.

या निकालानंतर खासदार नीलेश लंके यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, ''हा विजय माझा नाही हा सत्याचा, न्यायाचा आणि जनतेच्या अटळ विश्वासाचा विजय आहे. लोकसभेच्या निकालानंतर काहींनी जनतेच्या कौलाचा अपमान करत न्यायालयात धाव घेतली. खोटे आरोप, दबाव आणि निकाल बदलण्याचे प्रयत्न झाले; मात्र सत्य कधीच हरत नाही, हे आज पुन्हा सिद्ध झाले.''

ते पुढे म्हणाले, ''न्यायालयाने स्पष्ट संदेश दिला आहे की जनतेचा निर्णय हा सर्वोच्च असतो. मी न्यायव्यवस्थेचा मनापासून आभारी आहे. हा आनंद वैयक्तिक नसून नगर दक्षिणच्या जनतेच्या प्रेमाचा आणि विश्वासाचा सन्मान आहे. आम्ही कोणत्याही दबावाला झुकणार नाही. आमचा स्वाभिमान कायम ठेवत जनतेची सेवा करत राहू. अखेर सत्यमेव जयते.''

## निवडणूक खर्चावर करडी नजर

### राहुरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला निर्देश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर कडक नियंत्रण ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, प्रत्येक आर्थिक व्यवहारावर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांनी यासंदर्भात स्पष्ट सूचना देत पारदर्शकतेवर भर दिला आहे.

उमेदवारांनी निवडणुकीसाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे सक्तीचे करण्यात आले आहे. तसेच बँकांमधील दहा लाख रुपयांपेक्षा अधिक संशयास्पद व्यवहारांची माहिती थेट प्राप्तिकर विभागाला देणे बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे काळा पैसा आणि अनधिकृत खर्चावर आळा बसणार आहे.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उमेदवारांच्या खर्चाची नियमित तपासणी केली जाणार आहे. प्रत्येक तपासणीदरम्यान किमान तीन दिवसांचे अंतर ठेवण्यात येणार असून, १५, १८ आणि २१ एप्रिल या तारखांना तपासणी होणार आहे. तपासणीवेळी उमेदवारांचे प्रतिनिधी अनुपस्थित असल्यास त्यांना नोटीस बजावली जाणार आहे.

माध्यम प्रमाणन व नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून वर्तमानपत्रे, दूरचित्रवाणी आणि समाजमाध्यमांवर बारकाईने नजर ठेवली जाणार आहे. 'पेड न्यूज'च्या प्रकरणांची सखोल चौकशी करून त्याचा खर्च उमेदवारांच्या खात्यात जमा केला जाणार आहे. जाहिरात खर्चाचे अहवाल वेळेत सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

नागरिकांकडून 'सी–व्हिजिल' प्रणालीवर येणाऱ्या तक्रारींवर तत्काळ कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निवडणूक प्रक्रियेत नागरिकांच्या सहभागाला यामुळे बळ मिळणार आहे. पोलीस, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि भरारी पथकांनी मतदारसंघातील अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्व पथकांनी दररोजच्या कारवाईचे अहवाल अद्ययावत ठेवून एकत्रित अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या बैठकीस विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या पारदर्शक आणि काटेकोरपणे पार पाडाव्यात, अशा स्पष्ट सूचना खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांनी दिल्या.

#### परवानग्यांसाठी एक खिडकी योजना

एक खिडकी योजनेअंतर्गत प्रचारासाठी लागणाऱ्या वाहन व सभांच्या परवानग्या पारदर्शकपणे देण्यावर भर देण्यात आला आहे. परवानगी घेऊनही सभा न झाल्यास त्याची खातरजमा करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. तसेच प्रचार फेऱ्या व सभांचे चित्रीकरण करण्यासाठी व्हिडिओ निरीक्षण पथके कार्यरत ठेवण्यात येणार आहेत.

## अमेरिका-इराण यांच्यात पंधरा दिवसांचा युद्धविराम



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था** – अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ईरानसोबत युद्धविरामाची घोषणा केली असून, ''आम्ही ईरानमध्ये सैन्य पाठवणार होतो, पण आता त्याची गरज नाही,'' असे सांगत ट्रम्प यांनी युद्धविरामाची घोषणा केली.

ट्रम्प यांनी दोन आठवड्यांसाठी ईरानवरील हल्ले आणि बॉम्बहल्ले थांबवण्यावर सहमती दर्शवली असून, ईरानच्या १० सूत्रीय शांतता प्रस्तावाला त्यांनी व्यवहार्य म्हटले आहे. त्यानंतर ईराननेही अमेरिकेच्या १५ सूत्रीय प्रस्तावावर आधारित चर्चेला मान्यता दिल्याचे सांगितले आहे.

युद्धविरामानंतर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नसली, तरी वॉशिंग्टनमधील चिनी दूतावासाने शांततेसाठी प्रयत्न सुरू असल्याचे म्हटले होते. प्रवक्त्या माओ निंग यांनी सर्व पक्षांनी प्रामाणिकपणे युद्ध संपवण्याचे आवाहन केले.

युद्धविरामाच्या एक दिवस आधी चीन आणि रशियाने संयुक्त राष्ट्रातील होर्मुज सामुद्रधुनीसंदर्भातील प्रस्तावाला व्हेटोही दिला होता.

दरम्यान, ट्रम्प पुढील महिन्यात चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेण्यासाठी बीजिंग दौऱ्यावर जाणार आहेत. १४–१५ मे दरम्यान होणारी ही भेट महत्त्वाची मानली जात ■ पान ४ वर

## अभिषेक कळमकरचे आणखी एक कांड समोर

### नोकरीच्या आमिषातून कारमध्ये अत्याचार । अत्याचाराचा दुसरा गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका २७ वर्षीय युवतीवर कारमध्ये अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून माजी महापौर अभिषेक कळमकर याच्याविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आधीच दाखल असलेल्या प्रकरणामुळे त्याच्या अडचणीत मोठी भर पडली आहे.

पीडित युवतीने दिलेल्या फिर्यादीत नमूद केल्यानुसार, मे २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान तिची ओळख कळमकर याच्याशी झाली होती. त्या वेळी ती बेरोजगार असल्याचे सांगितल्यावर आरोपीने तिला नोकरीसाठी मदत करण्याचे आश्वासन देत तिचा मोबाईल क्रमांक घेतला. त्यानंतर जुलै २०२४ मध्ये त्याने पुन्हा संपर्क साधून शोरूममध्ये काम देण्याच्या बहाण्याने तिला बेलेश्वर मंदिर परिसर, पाथर्डी रस्त्यावर बोलावले.

पीडिता तेथे पोहोचताच आरोपीने तिला स्वतःच्या कारमध्ये बसवले. नगर क्लबच्या पुढे एका निर्जन ठिकाणी कार उभी करून पिण्यासाठी पाण्याची बाटली दिली. पाणी पिल्यानंतर तिला ग्लानी आल्याचा फायदा घेत आरोपीने नोकरीचे आमिष दाखवत तिच्या इच्छेविरुद्ध कारमध्येच अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर तिला धमकावून सोडून देण्यात आले.

यानंतर काही दिवसांनी आरोपीने पुन्हा संपर्क साधत भेटण्याचा दबाव टाकला. पीडितेने नकार दिल्यावर कारमधील घटनेचे फोटो ■ पान ४ वर

#### दीड महिन्यापासून अभिषेक फरार

कळमकर याच्याविरुद्ध यापूर्वीही २१ फेब्रुवारी रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात शिरूर येथील एका तरुणीच्या फिर्यादीवरून अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. त्या प्रकरणातही नोकरीचे आमिष दाखवून अत्याचार केल्याचा आरोप आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार असून, त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळला आहे. तसेच न्यायालयाने त्याच्याविरुद्ध स्टँडिंग वॉरंटही जारी केले आहे. आता दुसरा गुन्हा दाखल झाल्याने त्याच्या कायदेशीर अडचणी अधिकच वाढल्या आहेत.

## डॉक्टर तरुणीला खंडणी मागितली, नगरमधील वकिलावर गुन्हा दाखल

### खासगी व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन दोन लाखांची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** नोकरीसाठी अर्ज देण्यासाठी आलेल्या एका डॉक्टर तरुणीचा पाठलाग करून तिच्या व तिच्या बहिणीच्या खासगी व्हिडिओंच्या नावाखाली दोन लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या एका संशयित वकिलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हर्षद चावला असे या प्रकरणातील आरोपीचे नाव असून, तो स्वतःला वकील असल्याचे सांगत राजकीय संबंधांचा बनाव करत असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.


याबाबत एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याच्या मुलीने तोफखाना पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. पीडित डॉक्टर तरुणी ६ एप्रिल रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास सिव्हील हॉस्पिटल येथील सिव्हील सर्जन कार्यालयात नोकरीचा अर्ज देण्यासाठी आली होती. त्या वेळी दुचाकी पार्किंगमध्ये आरोपीने तिचा पाठलाग केल्याचे समोर आले आहे. पीडितेने विचारणा केली असता आरोपीने आपण वकील असल्याचे सांगत विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केला.

यानंतर आरोपीने पीडितेचे व तिच्या डॉक्टर बहिणीचे खाजगी व्हिडिओ आपल्याकडे असल्याचा दावा करत ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. या व्हिडिओच्या बदल्यात दोन लाख रुपयांची मागणी करण्यात आली. पैसे न दिल्यास संपूर्ण कुटुंबाची बदनामी करून दोन्ही बहिणींचे वैद्यकीय क्षेत्रातील करिअर उद्ध्वस्त करण्याची धमकी देण्यात आली, असे फिर्यादीत नमूद आहे.

वारंवार पाठलाग करून लज्जास्पद वर्तन केल्याच्या आरोपावरून पोलिसांनी हर्षद चावला याच्याविरुद्ध संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक पूनम श्रीवास्तव करत आहेत.

## शेअर बाजार वधारला, सोने–चांदीच्या दरात उसळी

**पुणे, वृत्तसंस्था –** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धात दोन आठवड्यांसाठी शस्त्रसंधी झाल्यानंतर त्याचे चांगले परिणाम बाजारपेठेवर दिसून येत असून भारतीय शेअर बाजार तेजीत आला आहे त्याचप्रमाणे सोने आणि चांदीच्या दरात वाढ झाली आहे. हा दिलासा केवळ तात्पुरता असून युद्ध पूर्णपणे थांबलेले नसल्याने भावात पुन्हा चढउतार होण्याची शक्यता आहे.



सोनं बाहेरुन आयात केलं जातं सर्व देश सोनं खरेदी करत आहेत. सोन्याचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध जोपर्यंत होत नाही तोपर्यंत सोन्याचे भाव स्थिर राहणं अशक्य आहे. काल युद्ध थांबलं असलं तरी सोन्याचे दर ३००० रुपयांनी वाढले आहे. युद्ध पूर्णपणे ■ पान ४ वर

## मनपाच्या दोन सत्रातील साफसफाई निर्णयाविरोधात कर्मचाऱ्यांचा एल्गार

### एकाच सत्रात काम करण्याची ठाम मागणी; ९ एप्रिलपासून बेमुदत आंदोलनाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिका प्रशासनाने शहरातील दैनंदिन साफसफाईचे काम दोन सत्रांमध्ये करण्याचा घेतलेला निर्णय मनपा कर्मचारी युनियनने धुडकावून लावला असून, एकाच सत्रात कामकाज सुरू ठेवण्याची ठाम मागणी करत आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले आहे. यासंदर्भात तातडीने सकारात्मक निर्णय न झाल्यास गुरुवार दि. ९ एप्रिलपासून आरोग्य विभागातील सर्व सफाई कर्मचारी बेमुदत धरणे आंदोलन छेडणार असल्याचा इशारा युनियनने अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी निवेदनाद्वारे आयुक्त यशवंत डांगे यांना दिला आहे.





महानगरपालिका प्रशासनाने दि. १ एप्रिल २०२६ पासून शहरातील साफसफाईचे कामकाज दोन सत्रांमध्ये सकाळी ६ ते १० व दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, युनियनच्या मते हा निर्णय प्रत्यक्ष परिस्थितीला धरून नसून कामगारांसाठी अत्यंत गैरसोयीचा आहे. अनेक वर्षांपासून एकाच सत्रात साफसफाईचे काम सुरळीत सुरू असताना अचानक दोन सत्रांचा निर्णय घेणे अयोग्य असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

युनियनचे सरचिटणीस कॉ. आनंदराव वायकर यांनी निवेदनात म्हटले आहे की, बहुतांश सफाई कामगारांना पहाटे ५ वाजताच घरातून निघावे लागते. वाहतूक सुविधेअभावी अनेकांना पायीच हजेरीवर यावे लागते. एका फेरीसाठी सुमारे एक तासाचा प्रवास करावा लागतो. अशा परिस्थितीत सकाळी काम करून पुन्हा दुपारी हजेरी लावणे कामगारांसाठी अत्यंत कष्टदायक ठरत आहे.

याशिवाय सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली असून दुपारच्या वेळेत प्रचंड उष्णतेचा तडाखा जाणवतो. दुपारी १२ नंतर नागरिकही घराबाहेर पडत नाहीत, अशा वेळी सफाई कर्मचाऱ्यांकडून काम ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### मृदुल मुनोत हिला गोल्ड मेडलसह एमबीबीएस पदवी



अहिल्यानगर- येथील मृदुल सीमा राहुल मुनोत हिला श्रीमती बी.के. शाहा मेडिकल इन्स्टिट्यूट अँड रिसर्च सेंटर, सुमन दीप विद्यापीठ, बडोदा यांच्यातर्फे एमबीबीएस साठी गोल्ड मेडल मिळाले आहे. एमबीबीएसच्या.श सलग चारही वर्षात ती कॉलेजमध्ये सर्वप्रथम आली. बडोदा येथे एका मोठ्या सोहळ्यामध्ये पदवीदान समारंभ पार पडला. मृदुल हिने इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण नगरमधील सेंट मायकल शाळेमधून घेतले. अकरावी आणि बारावीचे शिक्षण रामकृष्ण कॉलेजमधून पूर्ण केले. शाळेत असताना तिने अनेक स्पर्धांमध्ये बक्षीस मिळवले. ती बास्केटबॉल आणि बॅडमिंटनची राज्यस्तरीय खेळाडू आहे. विविध एकांकिका, पथनाट्य, वक्तृत्व अशा अनेक स्पर्धांमध्ये तिने यश मिळवले पारितोषिके मिळवली आहेत. सेंट मायकल शाळेची ती आदर्श विद्यार्थिनी घोषित झाली होती. रामकृष्ण कॉलेजमध्ये बारावीला ती प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. शिक्षणाबरोबर संस्कारांची जपवणूक सुद्धा तिने केलेली आहे. या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रविवारी मोफत दंतरोग तपासणी शिबीर



अहिल्यानगर- जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी म.सा. हॉस्पिटलमध्ये रविवार दि.१२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत मोफत दंतरोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. दंतरोग तज्ज्ञ डॉ.अर्पणा पवार, आणि ओरल सर्जन डॉ. स्वराज ठोले यावेळी शिबिरार्थींची तपासणी करणार आहेत. शिबिरात मेटल कॅप (१००० रूपये), सिरॅमिक कॅप (२००० व २५००रूपये), रूट कॅनल (२१०० ते ३००० रूपये), दात साफ करणे आणि दातांमध्ये सिमेंट भरणे प्रत्येकी ५०० रूपयांपासून पुढे, दातांची कवळी बसवणे ८०००, १००००, १४००० व २००००रूपये, इप्लांट १३५०० रूपये पासून पुढील दरात केले जाईल. औषधांचा खर्च वेगळा असेल. या शिबिराचा लाभ घेऊ इच्छिणारांनी ९४०४४७२१९९ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधून नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एम. आर. आय. २५०० रुपयात उपलब्ध आहे. २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब आणि ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सुविधा उपलब्ध आहे. दंतरोग मोफत तपासणी शिबीराचा अधिकाधिक गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन जैन सोशल फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी संपर्कः ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६.

# भाजपचा वटवृक्ष कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला आहे – प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण

## ''राष्ट्र प्रथम' मंत्रासह भाजपाचा विस्तार पक्षाच्या ४७व्या वर्षात प्रवेशानिमित्त प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रतिक्रिया''

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सोमवारी भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन आहे. ६ एप्रिल १९८० रोजी पक्षाची स्थापना झाली. पक्षाने ४६ वर्षे पूर्ण करून ४७व्या वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी लेख लिहून आपले विचार मांडले आहेत. सामान्य कार्यकर्ता ते पक्षाचा प्रदेशाध्यक्ष हा प्रवास फक्त भाजपसारख्या संघटनेतच शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे लिहिले की, विचारधारेच्या घट्ट मुळांनी मातीत रुजलेला आणि कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला भारतीय जनता पक्षाचा विशाल वटवृक्ष आज ४७व्या वर्षात पदार्पण करत आहे. ६ एप्रिल १९८० रोजी रोवलेले हे बीज आज सुमारे २५ कोटींहून अधिक कार्यकर्त्यांच्या मेहनतीने संपूर्ण देशभर विस्तारले आहे.

रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता, भाजयुमोचा उपाध्यक्ष, नगरसेवक, आमदार, कॅबिनेट मंत्री आणि आता प्रदेशाध्यक्ष या नात्याने जेव्हा मी पक्षाच्या इतिहासाकडे पाहतो, तेव्हा मला जाणवतं की जसे विचारधारेने एक एक कार्यकर्ते घडवले आणि त्याचप्रमाणे असंख्य ध्येयवादी कार्यकर्त्यांनी त्यांच्या रक्ता-घामाने गुरुदक्षिणा म्हणून पक्षाला घडवले. जेव्हा नेहरू-गांधींची अल्पसंख्याक-केंद्रित समाजवादी विचारसरणी आणि साम्यवादी चळवळींचा जागतिक प्रभाव होता, त्या काळात जनसंघाच्या माध्यमातून बहुसंख्य पण वंचित समाजाला केंद्रस्थानी ठेवण्याचे आणि प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचे धैर्य डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाल उपाध्याय आणि अटल बिहारी वाजपेयी यांसारख्या नेत्यांनी दाखवले. त्यांची दूरदृष्टी आजही आमच्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे.

**भाजपच्या या प्रवासात अनेक दिग्गज नेत्यांचे योगदान**

वैचारिक पाया आणि नेतृत्वाची परंपरा लाभलेल्या भाजपच्या या प्रवासात अनेक ऋषितुल्य नेत्यांचे मोठे योगदान राहिले आहे. महाराष्ट्र भाजपाचाच विचार करायचा झाला तर १९८० मध्ये उत्तमराव पाटील यांनी पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून पक्षाचा पाया रचला. त्यानंतर गोपीनाथ मुंडे यांनी पक्षाला गावागावात नेले आणि बहुजन व ओबीसी समाजाला मुख्य प्रवाहात आणत अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. १९९५ मध्ये काँग्रेसची सत्ता हटवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. प्रा. ना. स. फरांदे यांनी पक्षाला वैचारिक बळ दिले, तर सूर्यभान वहाडणे पाटील यांनी शिस्तबद्ध नेतृत्वातून संघटना मजबूत केली. भाऊसाहेब फुंडकर यांनी शेतकऱ्यांसाठी लढा देत पक्षाला शेतशिवारापर्यंत पोहोचवले. प्रमोद महाजन यांच्या निधनानंतर नितीन गडकरी यांनी कार्यकर्त्यांना सावरत संघटनेला नवी ऊर्जा दिली.

सुधीर मुनगंटीवार यांनी जनसंपर्काचा नवा अध्याय सुरू केला. २०१३ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने मोठी झेप घेतली आणि प्रदेशाध्यक्षपदावरून थेट मुख्यमंत्रीपदावर जाण्याचा अनोखा विक्रम घडला. त्यानंतर रावसाहेब दानवे, चंद्रकांत पाटील आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी संघटना आणि सरकार यांच्यात उत्तम समन्वय साधत पक्षाला शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवले.

जातीय राजकारणाला भाजपचे ठाम प्रत्युत्तर

कधी 'शेटजी-भटजी'ची पार्टी म्हणून टीका झालेल्या भाजपने ४६ वर्षांत महाराष्ट्रात ११ बहुजन समाजातील प्रदेशाध्यक्ष दिले, जे जातीय राजकारण करणाऱ्यांना ठोस उत्तर आहे. आज एक कार्यकर्ता म्हणून प्रदेशाध्यक्षाची जबाबदारी सांभाळताना, मला अभिमान वाटतो की सामान्य कार्यकर्त्यापासून या पदापर्यंत पोहोचणे केवळ भाजपातच शक्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील यश हे केवळ आकडे नसून जनतेचा विश्वास असल्याचे त्यांनी नमूद केले.

भारतीयत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व' हा विचार तळागाळात

भाजप ही केवळ बॅनर आणि सभांची संघटना नसून विचारधारेवर उभे असलेले कार्यकर्ते हीच तिची खरी ताकद आहे. 'भारतीयत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व' हा विचार आम्ही तळागाळापर्यंत पोहोचवला आहे. आम्हाला अनेकदा अति राष्ट्रवादी म्हटले जाते; पण देशाबद्दल अभिमान बाळगणे हा दोष असेल, तर तो आम्ही आनंदाने स्वीकारू. 'राष्ट्र प्रथम'ही आमच्या विचारधारेची मूळ भूमिका आहे. काळानुसार तंत्रज्ञानाचा स्वीकार करत भाजप एक 'टेक-फ्रेंडली' संघटना बनत आहे, ज्यामुळे बूथ स्तरापर्यंत कार्यकर्त्यांशी तात्काळ संपर्क साधणे शक्य झाले आहे. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल

भारताला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवणे आणि त्यात महाराष्ट्राचा १ ट्रिलियन डॉलरचा वाटा सुनिश्चित करणे, यावर विशेष भर दिला जात आहे. या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आणि गावपातळीवरील समस्या शासनापर्यंत नेणे, हे प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य आहे. हाच 'अंत्योदय'चा खरा अर्थ आहे. जेव्हा प्रत्येक भाजप कार्यकर्ता या भावनेने काम करेल, तेव्हाच 'विकसित भारत'चे स्वप्न साकार होईल आणि विकसित महाराष्ट्राशिवाय ते शक्य नाही.

# बाबुर्डी बेंद येथे दोन दिवस खंडोबा यात्रा उत्सवाचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



अहिल्यानगर– अहिल्यानगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद येथे खंडोबा यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेनिमित्ताने दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन बाबुर्डी बेंद ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

सालाबादप्रमाणे कालाष्टमीला १० एप्रिल २०२६ रोजी खंडोबा यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेनिमित्ताने भाविक जेजुरी येथील कऱ्हा नदी पात्रातून कावडीने पाणी आणतात. शुक्रवारी सकाळी कावडधारकांचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. कावडधारक सकाळी आठ वाजता देवाला पाणी घालतील. सायंकाळी सात वाजता महाआरती होईल. त्यानंतर काठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री जागरण गोंधळ कार्यक्रम होईल. ११ एप्रिल २०२६ रोजी भव्य आर्केस्ट्राचे नियोजन करण्यात आले आहे. दोन दिवस खाऊचे व खेळण्याचे दुकाने राहणार आहेत. यात्रेनिमित्त होणार्या विविध कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बाबुर्डी बेंद ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

### शिव पाणंद चळवळीचे राज्यस्तरीय अधिवेशन मढीत उत्साहात

# शेतरस्त्यांच्या लढ्याला नवे बळ– शरद पवळे

## ग्रामविकासासोबत ग्रामसीमा सुरक्षेलाही नवी दिशा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र चैतन्य कानिफनाथ देवस्थान, मढी येथे महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात पार पडले. देवस्थान ट्रस्टच्या सहकार्याने आयोजित या अधिवेशनाला राज्यभरातून मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहिले होते.

सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चाललेल्या या अधिवेशनाचे अध्यक्ष पुणे उपजिल्हाधिकारी गणेश मरकड होते. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, पाथर्डीचे निवासी तहसीलदार किशोर सानप, राज्य उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे, राज्य प्रसिद्धी प्रमुख रविंद्र खुडे, ज्येष्ठ नेते पोपट शेळके, अशोक कचरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल निर्मळ यांनी केले.

प्रास्ताविकात चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी देवस्थान ट्रस्ट, उपस्थित अधिकारी व राज्यभरातून आलेल्या शेतकरी बांधवांचे आभार मानले. राळेगणसिद्धीनारायणगव्हाण येथून सुरू झालेल्या शिव पाणंद चळवळीला पारनेर येथील आंदोलनानंतर अधिक गती मिळाली. पेरू वाटप आंदोलन, न्यायालयीन लढे तसेच विविध जनजागृती उपक्रमांमुळे शासनाचे लक्ष वेधले गेले आणि महत्त्वपूर्ण शासननिर्णय मिळवण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना पवळे म्हणाले, ''राज्यभर शासननिर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना प्रशासकीय व न्यायालयीन संघर्षातून मुक्त करणे आणि दर्जेदार शेतरस्त्यांचे स्वप्न पूर्ण करणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. शिव पाणंदमुळे ग्रामविकासासोबत ग्रामसीमा सुरक्षेलाही नवी दिशा मिळत आहे. अध्यक्षीय भाषणात उपजिल्हाधिकारी गणेश मरकड यांनी शेतकऱ्यांसाठी रस्ते खुले करताना आलेले अनुभव सांगून मार्गदर्शन केले. तसेच इतर अधिकाऱ्यांनी व चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनीही आपले अनुभव मांडत उपस्थित शेतकऱ्यांना प्रेरणा दिली.

या अधिवेशनास पोपट शेळके, विठ्ठल निर्मळ, अशोक कचरे, रविंद्र खुडे, सुरेश वाळके, बाळासाहेब थोरात, राजाभाऊ नागवडे, सचिन शेळके, विजय शेलार, शांताराम पानमंद, सुरेश भुजबळ, संतोष पाचर्णे आदींसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी शरद पवळे व पोपट शेळके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### मोफत नेत्रतपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

# २५० रुग्णांची तपासणी, ७० जणांचे मोफत मोतीबिंदू ऑपरेशन

## एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्या पुढाकारातून सेवा; शिबिरांविषयीची भीती दूर होत असल्याचे डॉ. आनंद किशोर बोज्जा यांचे मत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** शहरातील दिल्ली गेट परिसरात आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शमी गणपती मंदिरासमोर, कानूर पठार पतसंस्था येथे सुरू असलेल्या या शिबिरात एकूण २५० रुग्णांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ७० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी मोफत निवड करण्यात आली आहे.

पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडत असून, डॉ. आनंद किशोर बोज्जा (नेत्रचिकित्सक) यांनी स्वतः रुग्णांची तपासणी करून त्यांना योग्य उपचाराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ. बोज्जा म्हणाले की, पूर्वी मोफत शिबिरांबाबत लोकांमध्ये शंका आणि भीती होती. शस्त्रक्रिया योग्य होणार नाही, अशी भावना अनेकांच्या मनात होती. मात्र आज अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर आणि सेवा-भावी संस्थांच्या योगदानामुळे ही भीती दूर होत असून, अशा शिबिरांमुळे हजारो रुग्णांना नवदृष्टी मिळत आहे.

या शिबिराच्या माध्यमातून शहरासह उपनगर व ग्रामीण भागातील नागरिकांनाही मोठा लाभ होत असल्याचे दिसून आले. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी तपासणी करून घेतली असून, मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळत असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

या उपक्रमात रोटरी क्लब ऑफ नगर (आदेशा) चे नितीन थाडे यांचे सहकार्य लाभले. तसेच वेदांत व्यंकटेश बोमादंडी यांनी शिबिराचे नियोजन, समन्वय व रुग्ण व्यवस्थापनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या प्रयत्नांमुळे शिबिर सुरळीत पार पडत असून रुग्णांकडूनही समाधान व्यक्त केले जात आहे.

मोफत आरोग्य सेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हे शिबिर सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू असून, अधिकाधिक नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी वेदांत व्यंकटेश बोमादंडी (संपर्क : ७७५७८१५९८९ / ०२०-२६९७४१०९) यांच्याशी संपर्क साधावा.

# गोदावरी पात्रात वाळू माफियांचा हैदोस; जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करावी!

## महसूल विभागातील 'लाचखोरां'वरही संशय; दलालांचा मोकाट संचार, नागरिकांचा संताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील गोदावरी नदी पात्रात अवैध वाळू उपशाने अक्षरशः उच्छाद मांडला असून वाळू माफियांनी नदीपात्राचे लचके तोडल्याची धक्कादायक स्थिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी, अशी तीव्र मागणी गोदाकाठावरील शेतकरी व नागरिकांकडून होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या अंधारात मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू असून यामागे काही प्रभावशाली माफियांचा हात असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, या अवैध धंद्याला महसूल विभागातील काही कर्मचाऱ्यांचेच 'आशीर्वाद' असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे.

दरम्यान, एक खाजगी दलाल महसूल विभागाच्या वाहनातून फिरताना दिसत असल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. आयटीआय, वडवाळी कट, आपेगाव, दादेगाव, तुळजापूर नवगाव, हिरडपुरी आदी भागांत हा दलाल सक्रिय असून उघडपणे दलाली करत असल्याचेही सांगण्यात आले. या सर्व प्रकारामुळे संतप्त नागरिकांनी संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच गोदावरी नदी पात्राचे संरक्षण करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### नव्याने स्थापन १९ ओबीसी महामंडळांना भरीव निधी द्या - स्वाती सिरसुल

अहिल्यानगर - महाराष्ट्रातील ओबीसी



समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असून हा समाज सातत्याने भारतीय जनता पक्षाच्या पाठीशी उभा राहिला आहे. मात्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या समाजाच्या पारंपारिक व्यवसायांना काळाच्या ओघात मोठा फटका बसला असून अनेक उद्योगधंदे बंद पडले आहेत. परिणामी अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या १९ महामंडळांना तातडीने भरीव निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. स्वाती सिरसुल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. सौ. सिरसुल यांनी पत्रात नमूद केले आहे की, गेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी समाजासाठी स्वतंत्र महामंडळे स्थापन करून आर्थिक सुधारणा घडवून आणण्याचे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने गुजर, लेवा, पाटीदार, लोहार, रामोशी, नाभिक, सुतार, गुरव, शिंपी, लिंगायत आदी समाजांसाठी एकूण १९ महामंडळे स्थापन करण्यात आली. प्रत्येक महामंडळाला ५० कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणाही करण्यात आली होती. मात्र, मार्च २०२६ मध्ये सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात या महामंडळांसाठी कोणतीही निधी तरतूद करण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे राज्यातील ओबीसी समाजामध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. लिंगायत व गुरव समाजासाठी प्रयत्नांचे कौतुक सौ. सिरसुल म्हणाल्या की, लिंगायत समाजासाठी 'जगत ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ' तसेच गुरव समाजासाठी 'संत काशिबा गुरव युवा आर्थिक महामंडळ' स्थापन करून संबंधित समाजांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत झाले आहे. यापूर्वी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या उपसंस्था म्हणून सहा जातींसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळे स्थापन करण्यात आली होती. त्यापैकी केवळ दोन-तीन महामंडळांना एक कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून उर्वरित १९ महामंडळांना निधी मिळालेला नाही. त्यामुळे ही महामंडळे केवळ नावापुरतीच राहिली असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

### मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल; निवडीबद्दल सत्कार



अहिल्यानगर - अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा माजी नगरसेवक सचिन शिंदे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभात मान्यवरांच्या उपस्थितीत बाबासाहेब मुदगल यांचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत पतसंस्थेच्या माध्यमातून सभासद हिताचे काम अधिक प्रभावीपणे करण्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी एडवोकेट सतीश गीते, दिनकर आघाव गुरुजी, संजय साकुरे, जयकुमार डिडवानिया, अविनाश पांढरे, संजय जाधव, शिंदे सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी बाबासाहेब मुदगल यांच्या निवडीचे स्वागत करत त्यांच्या नेतृत्वाखाली पतसंस्थेचा अधिक विकास होईल, असा आशावाद व्यक्त केला.

# मोबाईलचा अतिवापर टाळा; आरोग्य रँकिंगमध्ये अव्वल येण्यासाठी प्रयत्न – आयुक्त यशवंत डांगे

**जागतिक आरोग्य दिनानिमित्त मनपाचा स्तुत्य उपक्रम | मोफत दंत–मुख आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद | जीवनदायी योजनेचा लाभ घ्या; आरोग्य हीच खरी संपत्ती – महापौर ज्योतीताई गाडे**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने जागतिक आरोग्य दिनानिमित्त मोफत दंत–मुख आरोग्य व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. शहरातील नागरिक, आशा सेविका, विद्यार्थी व महापालिका कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महापौर ज्योतीताई गाडे आपल्या मनोगतात म्हणाल्या की, महानगरपालिकेच्या माध्यमातून ''जीवनदायी'' योजनेअंतर्गत नागरिकांना विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नगरकरांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. आजच्या आधुनिक व धकाधकीच्या जीवनात नागरिक, विशेषतः महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे अशा आरोग्य शिबिरांचा लाभ घेऊन नियमित तपासणी करून निरोगी राहण्यासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. महापालिका आरोग्य विभागामार्फत शहरात ठिकठिकाणी तपासणी शिबिरांचे आयोजन केले जात असून, या माध्यमातून आजारांचे वेळेवर निदान होऊन डॉक्टरांना योग्य उपचार करणे शक्य होते. त्यामुळे आरोग्य शिबिरे ही आजच्या काळाची गरज बनली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नागरिकांनी केमिकलयुक्त अन्न



टाळून नैसर्गिक व संतुलित आहार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, उपायुक्त मेहेर लहारे, शहाजहान तडवी, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. आहाद शेख, डॉ. आलिया शेख यांच्यासह आशा सेविका, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी सांगितले की, जागतिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित या शिबिरात आशा सेविका, विद्यार्थी व महापालिका कर्मचाऱ्यांची दंत–मुख तपासणी करण्यात आली. यामध्ये दात, हिरड्या, जिभेचे आजार, एक्स–रे, लॅब तपासणी तसेच हिमोग्लोबिन (एचबी) तपासणी अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. दैनंदिन जीवनात दातांचे आरोग्य चांगले राखणे अत्यंत आवश्यक असून, त्यासाठी नागरिकांनी नियमित काळजी घेणे गरजेचे आहे. यासंदर्भात नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच राज्यातील आरोग्य रँकिंगमध्ये आघाडीवर येण्यासाठी मनपा आरोग्य विभाग सातत्याने प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

आयुक्त यशवंत डांगे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सध्याच्या काळात केवळ वातावरणातील प्रदूषणच नव्हे तर विचारांचे प्रदूषणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. नागरिकांनी मोबाईलचा मर्यादित वापर करणे गरजेचे आहे. महापालिकेच्या माध्यमातून शहरात २५ ठिकाणी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, डॉक्टर, कर्मचारी व आशा सेविकांनी नागरिकांमध्ये आजारांविषयी असलेले गैरसमज दूर करून विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. महापालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये दररोज १०० ते १५० रुग्णांची तपासणी होणे अपेक्षित असून, जे डॉक्टर कामात कसूर करतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी लोकचळवळ उभी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या आरोग्य शिबिरांची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने नागरिक या शिबिरांचा लाभ घेऊन आपल्या आजारांचे वेळेवर निदान करून उपचार घेऊ शकतील, असे त्यांनी सांगितले.

## खांब उभे पण दिवे गायब! महावीर नगरमध्ये अंधारामुळे नागरिक त्रस्त



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील महावीर नगर परिसरात पथदिव्यांचे खांब उभारण्याचे काम काही महिन्यांपूर्वी पूर्ण झाले असले, तरी अद्याप त्या खांबांवर दिवे बसवण्यात आलेले नाहीत. परिणामी संपूर्ण परिसर रात्रीच्या वेळी अंधाराच्या विळख्यात सापडत असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

महावीर नगरमध्ये मुख्य रस्त्यांसह अंतर्गत गल्ल्यांमध्येही अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. रात्रीच्या वेळी पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच वाहनचालकांना सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः शाळा–कॉलेजमधून घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यांना अंधारामुळे धोका वाढला असून अपघात किंवा अन्य अनुचित प्रकार घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

स्थानिकांच्या मते, पथदिव्यांचे खांब उभारल्यानंतर प्रशासनाकडून काम पूर्णत्वास नेण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. ''खांब उभे करून काम पूर्ण झाले असे दाखवले जात आहे, मात्र प्रत्यक्षात दिवे नसल्यामुळे त्याचा काहीही उपयोग होत नाही,'' अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली.

या संदर्भात समाजसेवक अविनाश देडगावकर यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले असून, संबंधित विभागाने तातडीने पथदिवे बसवून ते सुरू करावेत, अशी मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, ''महावीर नगरसारख्या वाढत्या वस्तीच्या भागात मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. नागरिकांच्या सुरक्षेसाठी पथदिवे त्वरित कार्यान्वित करणे अत्यावश्यक आहे.

महावीर नगरमधील नागरिकांनीही प्रशासनाकडे निवेदन देण्याची तयारी दर्शवली असून, लवकरात लवकर काम पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशाराही दिला आहे. दरम्यान, संबंधित प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत तातडीने उपाययोजना करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद अहिल्यानगर दक्षिण कार्यकारणी जाहीर

**जिल्ह्यात समता परिषदेची पुनर्बांधणी करून अधिक जोमाने, सर्वांना बरोबर घेऊन काम करु – सुभाष लोंढे**



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** रोजी होणाऱ्या क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीचे तसेच द्विशताब्दी वर्षानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमा संदर्भात नियोजन आणि नवनियुक्त जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.याबाबत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची जिल्हा कार्यकारणी बैठक जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली झाली .

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे म्हणाले कि थोर समाज सुधारक महात्मा फुले जयंती सर्व तालुक्यात समता परिषदेच्या बॅनरखाली साजरी करण्याचे ठरले. तसेच द्विशताब्दी वर्षानिमित्त ११ एप्रिल पासून वर्षभर जिल्हात कार्यक्रम घेण्यात येतील.महात्मा फुले समता परिषदेच्या प्रत्येक तालुक्यात नवीन शाखा उघडण्याचे यावेळी ठरविण्यात आले.

यावेळी जिल्हा कार्यकारिणी सदस्यांना यावेळी नियक्ती पत्र देण्यात आली.

महात्मा फुले समता परिषद अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी सुभाष लोंढे यांची फेर निवड केल्याबद्दल महात्मा फुले समता परिषद संस्थापक अध्यक्ष नामदार *छगनराव भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ यांचे विशेष आभार मानले. या पुढील काळात जिल्ह्यात समता परिषदेची पुनर्बांधणी करून अधिक जोमाने ,सर्वांना बरोबर घेऊन काम करु असा विश्वास व्यक्त केला.

सुभाष लोंढे यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल , ओबीसी महामंडळाचे मा. अध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, मा. आ. पांडुरंगजी अभंग, मा. जि. प. सदस्य अण्णासाहेब शेलार, महात्मा फुले समता परिषद प्रदेश चिटणीस अंबादासजी गारुडकर, जिल्हा परिषद सदस्य शरद भाऊ झोडगे, प्रदेश प्रवक्ते डॉ. नागेश गवळी, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, भगवानराव फुल सौंदर, नगरसेवक रमेश गोरे, विभागीय अध्यक्ष मच्छिंद्र गुलदगड, प्रदेश चिटणीस अनिल निकम, किसनराव रासकर, सुवर्णा धाडगे यांनी अभिनंदन केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे कार्याध्यक्ष अर्जुन मेहेत्रे (जामखेड), महिला अध्यक्ष संगीता ढवळे (शेवगाव)तालुकाध्यक्ष –नवनाथ खामकर (पारनेर),सोमनाथ धाडगे (नगर),संभाजी गदादे (कर्जत),

नागनाथ वाळके (पाथर्डी),सुनील शिंदे, (जामखेड),सुरेश थोरात, (शेवगाव ) तसेच नवनाथ शिंदे (उपाध्यक्ष),सय्यद अन्सार ( उपाध्यक्ष ), रामदास नगरे, अनिल चौधरी, कृष्णा पांचाळ, आकाश वाघ ,भरत गारुडकर, वसंत रांधवन, बबन घुमटकर, महेश थोरात, किरण नगरे, सय्यद आरिफ, तन्मय खामकर, हर्षद खामकर, अविनाश लोखंडे, बबन चौरे, विश्वनाथ राऊत, राजेंद्र शेलार, युवराज हजारे, रामदास नगरे , किरण वाघ, राणीताई जाधव आदी उपस्थित होते. प्रसाद भडके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## प्रसिद्ध चित्र शिल्पकार प्रमोद कांबळे यांना डी. वाय. पाटील विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पुणे येथील डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ अप्लाइड आर्ट्स अँड क्राफ्ट्सतर्फे आयोजित आकृती २०२५–२६ या वार्षिक शैक्षणिक कला प्रदर्शनाचे उद्घाटन १० एप्रिल रोजी होणार आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे जागतिक कीर्तीचे ज्येष्ठ चित्र शिल्पकार प्रमोद कांबळे यांना यंदाचा मानाचा डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**पुरस्कारांची लखलखती कारकीर्द**

प्रमोद कांबळे यांच्या कलेचा प्रवास थक्क करणारा आहे. नुकत्याच झालेल्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अयोध्येत त्यांच्या कलेचा विशेष सन्मान करण्यात आला. यासोबतच त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा जीवनसाधना गौरव पुरस्कार, नाशिकच्या वसंत व्याख्यानमालेत



गोदावरी गौरव पुरस्कार आणि मागील वर्षी भारतीय कलाप्रसारिणी सभेच्या अभिनव कला महाविद्यालयातर्फे दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. केवळ नागरी सन्मानच नव्हे, तर हैदराबाद येथे भारतीय लष्कराकडून त्यांचा विशेष सन्मान झाला असून, भारतीय वायुदलाच्या एअर चीफ मार्शल यांच्या हस्ते विशेष मेडल देऊनही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. पुणे येथे नॅशनल डिफेन्स अकॅडमी मध्ये त्यांनी उभारलेल्या शौर्य स्मारकाबद्दल त्यांचा भारतीय सैन्य दलाच्या प्रमुखांकडून विशेष मेडल देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या या समृद्ध योगदानाची ०दखल घेऊनच डी. वाय. पाटील विद्यापीठाने हा सर्वोच्च सन्मान जाहीर केला आहे.

शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता आकुर्डी येथील विद्यापीठ परिसरात हा सोहळा संपन्न होईल. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून हंग्री फिल्म्सचे संचालक आणि जाहिरात क्षेत्रातील दिग्गज महेश घरत उपस्थित राहणार आहेत, तर सन्माननीय अतिथी म्हणून प्रसिद्ध कलाकार पराग बोरसे उपस्थित राहतील.जे बिल्डिंग, पहिला मजला, गणेश आयडॉल जवळ, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, आकुर्डी येथे विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे दर्शन सर्वांना घेता येईल. या सोहळ्याला कुलपती डॉ. संजय डी. पाटील, कुलगुरू प्रा. मनीष भल्ला आणि स्कूल ऑफ अप्लाइड आर्ट्स अँड क्राफ्ट्सचे संचालक जयप्रकाश कलवाले यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## पारनेर पंचायत समिती अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती विकास कामांमध्ये अनियमितता

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पारनेर पंचायत समिती अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती विकास योजनेतील कामांमध्ये झालेल्या कथित अनियमिततेबाबत ग्रामविकास अधिकाऱ्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने संताप व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात चौकशी अहवाल सादर होऊन तब्बल १५ महिने उलटूनही संबंधित अधिकाऱ्याचे निलंबन न केल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करुन तातडीने कारवाई करण्याचे नाशिक विभागीय आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे. अन्यथा २० एप्रिल जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

पारनेर पंचायत समिती अंतर्गत राळेगण थेरपाळ ग्रामपंचायतमध्ये सन २०२२–२३ या कालावधीत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती विकासासाठी विविध कामे मंजूर करण्यात आली होती. मात्र या कामांमध्ये आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात विस्तार अधिकारी (पंचायत) व कनिष्ठ लेखा अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत ग्रामविकास अधिकारी यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी शासकीय दस्तऐवजांमध्ये फेरफार केल्याचे स्पष्ट झाले.

## कु. श्रद्धा अशोक डोळसे व सौ. शुभदा विशाल देवकर यांना 'डिझाईन एक्सलन्स' अवॉर्डने सन्मानित

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आय डी टी एज्युकेशन, नासिक या संस्थेमार्फत दशवार्षिक समारंभा निमित्ताने भव्य कार्यक्रमात इंटेरियर डिझायनर कु श्रद्धा डोळसे व सौ शुभदा देवकर या दोघी भगिनींना डिझाईन एक्सलन्स अवॉर्ड देऊन सन्मानित केले.

प्रसिद्ध मराठी अभिनेते चिन्मय उदगीरकर यांच्या हस्ते हा सन्मान श्रद्धाने केलेल्या सुंदर इंटेरियर डिझाइन्स व इंटेरियर या क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्यसाठी तसेच सौ शुभदा हिने फॅशन डिझायनिंग क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल दोघींचा हा सन्मान या संस्थेने केला. याप्रसंगी आर्किटेक्ट, शिल्पकार व सिने सेट डिझायनर श्याम लोंढे, संस्थेचे संस्थापक प्रा. महेंद्र शेवाळे, सौ स्नेहल शेवाळे उपस्थित आदी मान्यवर होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष लोंढे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की सौंदर्य हे आपल्या विचारात आणि कृतीत असते त्याचाच उपयोग करून आपण केलेली डिझाईन, कलाकृती ही बोलत असते. आपली कलाकृती, डिझाईनेच त्या कलाकाराविषयी सांगायला हवे आणि उत्तम इंटरियर डिझायनर, फॅशन डिझायनर आपल्या डिझाइन्स मधूनच वेगळेपण दर्शवितात. त्यांची कलाकृती हीच त्यांचे व्यक्त होण्याचे माध्यम असते. यावेळी अभिनेते उदगीरकर यांनी मार्गदर्शन करताना



आधी स्वतः सौंदर्य समजून घ्यावे कारण आपले विचार आपली कृती हेच आपल्या निर्मितीमध्ये परावर्तित झालेली दिसते. त्यामुळे प्रथम स्वतःला कलात्मक आणि सकारात्मक संदेश देत राहा. अभ्यासातील सातत्य आणि नाविन्याचा शोध यातून नक्कीच उत्तम निर्मिती होते. यावेळी संस्थापक प्रा. शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर केल्यामुळे आपले आयुष्य देखील आनंदी होते हे आवर्जून सांगितले.

रेडिसन ब्लू हॉटेल मध्ये भव्य मंचावर संपन्न झालेल्या या कार्यक्रमात हा सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल श्रद्धाचे व शुभदाचे अभिनंदन प्रा. शिरीष मोडक, संजय जोशी, ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, श्यामसुंदर सारडा ॲड. दीपक शर्मा, लक्ष्मण देवकर, ज्ञानेश्वर काळे,अमोल खोले, सचिन हिवाळे, हरिभाऊ डोळसे, सोमनाथ देवकर, गौरव भन्साळी, रवींद्र वाघमारे नंदकुमार देशपांडे, राजेंद्र टाक, आदींनी केले.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत प्रथमवर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथमवर्षातील विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यासाठी त्यांचे स्वागत करून सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमास फाउंडेशनचे तांत्रिक संचालक श्री.सुनील कल्हापूरे, प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर, विभागप्रमुख डॉ.सतीश मरकड सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेत सर्व विषय उत्तीर्ण होऊन विशेष प्रावीण्यासह प्रथमश्रेणी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्री.कल्हापूरे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, सातत्याचे आणि जिद्दीचे कौतुक करताना सांगितले की, ‘‘ ही केवळ सुरुवात आहे. सुरुवात चांगली झाली तर पुढील वाटचाल नक्कीच यशस्वी होते.‘‘ त्यांनी विद्यार्थ्यांना पुढेही सातत्याने परिश्रम करण्याचा सल्ला देत शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य डॉ.नवथर यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करून भविष्यातही असेच यश मिळेल.असा विश्वास व्यक्त केला.

विभागप्रमुख डॉ.मरकड यांनी सांगितले की, ‘‘हे यश विद्यार्थ्यांच्या कष्टांचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे.‘‘ तसेच व्यवस्थापनाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा व विद्यार्थ्यांसाठी राबवलेल्या उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रथम वर्ष समन्वयक डॉ.संदीप उदावंत यांनी आभार मानताना सांगितले की, हा कार्यक्रम श्री.सुनील कल्हापूरे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना सतत प्रेरणा मिळत आहे. या सत्कार सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन ऊर्जा व आत्मविश्वास निर्माण झाला असून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रेरणादायी दिशा मिळाल्याचे सांगितले.

प्रथम वर्ष शैक्षणिक समन्वयक डॉ.उदावंत, डॉ.गणेश शिरसाट तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांच्या अथक परिश्रमांमुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

डॉ.विखे पा.फाउंडेशनचे सचिव डॉ.पी.एम.गायकवाड यांनी नव्या पिढीतील विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर विश्वास व्यक्त केला. विखे पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे संचालक डॉ.अभिजीत दिवटे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खासदार डॉ.श्री.सुजय विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांना अशाच जिददीने व आत्मविश्वासाने शैक्षणिक प्रवास पार पाडण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष नामदार तथा जलसंपदा मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ.हेगडेवार शिक्षण प्रतिष्ठान आयोजित प्रज्ञाशोध परिक्षेत हिंदसेवाचे सात विद्यार्थी चमकले

## प्रज्ञाशोध परिक्षेत हिंदसेवाचा चिन्मय म्हस्के जिल्ह्यात दुसरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, बागडपट्टी विभागाचे इयत्ता चौथीतील ७ विदयार्थी डॉ.हेगडेवार शिक्षण प्रतिष्ठाण आयोजित अहिल्यानगर प्रज्ञाशोध परिक्षेत जिल्हास्तर गुणवत्ता यादीत चमकले.शाळेतील इयत्ता चौथी मधील चिन्मय म्हस्के हा २८० गुण मिळवत जिल्हयात दुसरा आला.त्याचप्रमाणे अर्णवी कांबळे –जिल्हयात आठवी,अदिती खेडकर–जिल्हयात नववी,राजकुमार निसाद–जिल्हयात दहावा,जिविका ताकपेरे–जिल्हयात चौदावी,असद शेख–जिल्हयात सतरावा व सीमरा शेख–जिल्हयात सतरावी आली.

दरवर्षी स्पर्धा परीक्षेसाठी शाळेतील विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते.यासाठी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे तसेच सर्व शिक्षक परिश्रम घेत असतात.विद्यार्थ्यांनी प्राथमिक शाळेपासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करुन भविष्यात उज्वल या संपादन करावे.मागील २५ वर्षापासून अहिल्यानगर प्रज्ञाशोध परीक्षेत शाळेचे विद्यार्थी सातत्यपूर्ण गुणवत्ता यादीत चमकत आहेत.याचा आम्हास नक्कीच अभिमान आहे.स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांमुळे शाळेच्या नवलौकिकात भर पडत आहे.असे गौरोद्गार शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यानी काढले.

या सर्व विदयार्थांना शाळेतील शिक्षिका सौ.मनिषा साळी व मुदस्सिर पठाण यांनी मार्गदर्शन केले. सर्व गुणवंत विदयार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा, संस्थचे अध्यक्ष शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी तसेच शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे आदींनी केले आहे.

# राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य पुरस्कार जाहीर; जिल्हास्तरीय पुरस्कारही घोषित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय वाड्मय स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून ‘वाडा’, ‘पिंजारलेल्या कल्लोळातून’, ‘निळी सावळी नव्हाळी’, ‘नामानिराळा’ यांसह एकूण अकरा पुस्तकांना राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

या पुरस्कारांचे वितरण २३ व २४ मे रोजी होणाऱ्या साहित्य संमेलनात करण्यात येणार असल्याची माहिती शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे व संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी दिली.

शब्दगंध साहित्यिक परिषदेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रा. डॉ. अनिल गर्जे, प्रा. डॉ. किशोर धनवटे, प्रा. डॉ. आशा पालवे, बाळासाहेब शेंदुरकर, स्वाती ठुबे व शर्मिला गोसावी यांनी परीक्षण करून निकाल जाहीर केला.

राज्यस्तरीय पुरस्कार विजेते पुढीलप्रमाणे : कादंबरी : वाडा संदीप वाकडे, कथासंग्रह : पिंजारलेल्या कल्लोळातून डॉ. संदीप तपासे (नाशिक), काव्यसंग्रह : निळी सावळी नव्हाळी डॉ. स्वाती पाटील (सांगली), काव्य : ऊसवलेलं शिवता येईल का? वर्षा चौबे (चंद्रपूर), आत्मकथन : मायंबा ते मुंबई डॉ. शिवाजी घुंगरड (पनवेल) , व्यक्तीचित्रण : आदर्श छत्रपती शिवाजी महाराज डॉ. मधुकर जाधव (चंदगड), संशोधन ग्रंथ : सृजनकडून सर्जनशीलतेचा प्रवास डॉ. स्नेहा महांबर (गोवा), बालवाङ्‌मय : ढ.. ढ.. डॉ. विशाल तायडे (संभाजीनगर), गझलसंग्रह : नामानिराळा बाळ पाटील (धाराशिव), लेखसंग्रह : रे मना वैशाली जाहागीरदार (छत्रपती संभाजीनगर), प्रवासवर्णन : सावळ्या विठ्ठलाच्या देशात वर्षा कुवळेकर (अलिबाग) जिल्हास्तरीय शब्दगंध साहित्य पुरस्कार २०२५ :

काव्यसंग्रह : अव्यक्ताचा चंद्र शारदा घोडके (देऊळगाव), आत्मचरित्र : दौलतनामा दौलत जाधव (कोपरगाव), कथासंग्रह : चरेविती सयाजी शिंदे (राहुरी), लेखसंग्रह : अर्षदनामा अर्शद शेख (नगर)

या पुरस्कारांचे स्वरूप शाल, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे असून संमेलनात सर्व साहित्यिकांचा सन्मान करण्यात येणार आहे.

या सर्व विजेत्यांचे सुनील गोसावी, राजेंद्र उदागे, भगवान राऊत, ज्ञानदेव पांडुळे, प्रा. डॉ. अशोक कानडे, जयश्री झरेकर, भारत गाडेकर, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, राजेंद्र फंड, बबनराव गिरी, सुभाष सोनवणे, राजेंद्र पवार, रविंद्र दानापुरे, प्रशांत सूर्यवंशी, मकरंद घोडके तसेच संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांनी अभिनंदन केले आहे.

# श्रीगोंदा तालुक्यात सुभेदार विष्णू शेळके यांचा भव्य नागरी सत्कार

**दैनिक आकर्षण । केशव कातोरे**



**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील शेळकेवाडी येथील सुभेदार विष्णू आबाजी शेळके यांनी भारतीय सैन्य दलाच्या सिग्नल रेजिमेंटमध्ये तब्बल ३० वर्षे उल्लेखनीय सेवा बजावून निवृत्ती घेतल्याबद्दल राजापूर ग्रामस्थांसह विविध संस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. हा सत्कार प्रेम मूर्ती माधव बाबा इंगोले (लाल बाबा आश्रम, आळंदी) व गुरुवर्य उल्हास महाराज सूर्यवंशी (आळंदी) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

या कार्यक्रमास माजी आमदार राहुल जगताप, निवृत्त कर्नल साहेबराव शेळके, निवृत्त लेफ्टनंट कर्नल पंढरीनाथ देवकर, संपतराव ढवळे, त्रिदल अहिल्यानगर जिल्हा माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष संदीप सांगळे, निवृत्त कॅप्टन विश्वनाथ ढवळे, राष्ट्रपती पुरस्कार विजेते सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक नंदकुमार सूर्यवंशी, निवृत्त पोलीस निरीक्षक पोपटराव ओहोळ यांच्यासह अनेक मान्यवर, आजी–माजी सैनिक, राजकीय नेते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

७ मार्च १९९६ रोजी पुणे येथे सैन्यात भरती झाल्यानंतर सुभेदार शेळके यांनी जबलपूर येथून आपल्या सेवेला सुरुवात केली. आपल्या तीन दशकांच्या सेवाकाळात त्यांनी भोपाळ, इंदोर, जम्मू–काश्मीर, सिलिगुडी, पंजाब आदी ठिकाणी कर्तव्य बजावत धाडसी व कर्तव्यदक्ष सैनिक म्हणून लौकिक मिळवला.

त्यांच्या कुटुंबालाही देशसेवेची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. त्यांचे आजोबा गणपतराव शेळके हे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेत कार्यरत होते, तर मोठे बंधू तुकाराम शेळके यांनी कारगिल युद्धात सहभाग घेतला होता. सध्या त्यांचे पुतणे प्रथमेश शेळके भारतीय नौदलात कार्यरत आहेत.

सत्कार समारंभापूर्वी गावातून सुभेदार शेळके यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी महिलांनी औक्षण करून त्यांचे स्वागत केले. हा कार्यक्रम शेळकेवाडी राजापूर येथील श्री संत विठ्ठल बाबा समाधी मंदिराच्या प्रांगणात पार पडला. यावेळी गुरुवर्य उल्हास महाराज सूर्यवंशी यांचे कीर्तनही झाले. ‘‘देशसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे,’’ असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

आपल्या भाषणात सुभेदार विष्णू शेळके यांनी ३० वर्षांच्या सेवेत आलेले अनुभव सांगत उपस्थितांचे आभार मानले. तसेच त्यांनी आपल्या आई–वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ श्री संत विठ्ठल बाबा देवस्थान, श्री संत सदाशिव बाबा देवस्थान, देवदरा देवस्थान, महात्मा गांधी विद्यालय, प्राथमिक शाळा व अंगणवाडी यांना रोख देणगी जाहीर केली.

**‘श्री संत विठ्ठल बाबा महात्म्ये’ पुस्तकाचे प्रकाशन**

या कार्यक्रमात राजापूर पंचक्रोशीतील श्रद्धास्थान असलेल्या श्री संत विठ्ठल बाबा यांच्या जीवनकार्यावर आधारित ‘श्री संत विठ्ठल बाबा महात्म्ये’ या पुस्तकाचेही प्रकाशन करण्यात आले. सेवानिवृत्त शिक्षक नामदेव शेळके यांनी ऐतिहासिक व तोंडी परंपरेतून मिळालेली माहिती संकलित करून हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचे लोकार्पण माधव बाबा इंगोले व उल्हास महाराज सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास शंकर पाडळे, अशोक ईश्वरे, सेवा सोसायटीचे अध्यक्ष श्रीपाद कवाष्टे . मा. सरपंच सचिन चौधरी, अशोक मांडगे, अशोक भाऊ वाखारे, रेवजी घेगडे, रवींद्र शिंदे, ह.भ.प. माणिक महाराज, बाळासाहेब करंजुळे, बाळासाहेब पठारे, विलास कवास्टे आदी मान्यवर उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रा. केशव कातोरे व नामदेव शेळके यांनी केले.

# भगवानगड ट्रस्ट संचलित स्पर्धा परीक्षा केंद्रातील आणखी तीन विद्यार्थ्यांची अधिकारी पदाला गवसणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**भगवानगड–** पुणे येथील रयत प्रबोधिनी ही स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी मार्गदर्शक ठरणारी एक अग्रगण्य संस्था आहे. ह्या संस्थेच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या प्रामुख्याने गट ब व गट क परीक्षा तसेच अनेक परीक्षांसाठी नियोजनबद्ध पद्धतीने विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते. या संस्थेने ऑगस्ट २०२३ मध्ये शासकीय अधिकारीपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांना निमंत्रित केले होते. या कार्यक्रमात बोलताना श्रीगुरु शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर आपण स्पर्धा परीक्षा केंद्र सुरु करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार भगवानगडावरील स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शास्त्री बाबांनी रयत प्रबोधिनीवरच सोपवली होती. भगवानगडावर सुरु झालेल्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांनी अपार मेहनतीच्या जोरावर अनेकांनी अधिकारीपदाला गवसणी घातली आहे. त्यापैकी जय बाळू जपकर (कर सहाय्यक), ज्ञानेश्वर अंबादास दराडे (कालवा निरीक्षक अहिल्यानगर), अशोक बाजीराव ढाकणे (विद्युत सहाय्यक महावितरण) अशा वेगवेगळ्या पदांवर निवड झाली आहे. तसेच यापूर्वी सूरज अहिरे (तलाठी व ग्रामसेवक), किरण भास्कर सानप (आरोग्य सेवक व महसूल सहाय्यक), सुभाष रंगनाथ मोहिते

(प्राध्यापक, .... कॉलेज, छत्रपती संभाजीनगर), विजय संजय दहिफळे (दारूबंदी पोलीस), पोपट संतोष जगताप (महसूल सहाय्यक), दीपक रामराव बटूळे (महसूल सहाय्यक), प्रफुल्ल गोदरु डोरले (कर निरीक्षक), रविकिरण अजिनाथ कुटे (महसूल सहाय्यक), दीपक आव्हाड (महसूल सहाय्यक) इत्यादी विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या खात्यात अधिकारीपदी निवड झालेली आहे. या निवडीबद्दल श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे. आपल्या गडावर कीर्तनकारांसोबतच अधिकारी देखील घडवले जात असल्याने गडाच्या भक्तवर्गात देखील उत्साह व आनंदाचे वातावरण आहे.

# वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा

## विविध उपक्रमांचे आयोजन । रांगोळी व पोस्टर स्पर्धेतून सर्जनशीलता व वैज्ञानिक दृष्टिकोन प्रभावीपणे मांडला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–**कल्याण रोड येथील वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग व आनंदऋषीजी नर्सिंग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने ‘या संकल्पनेवर आधारित जागतिक आरोग्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग चे संचालक सुनील मालू यांनी मार्गदर्शन केले.त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली.तसेच विज्ञानाधिष्ठित आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित झाले.

या निमित्ताने रांगोळी,पोस्टर व मॉडेल बनवा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सर्जनशीलता व वैज्ञानिक दृष्टिकोन प्रभावीपणे मांडला.

या कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी व उत्कृष्ट नियोजन प्राचार्य डॉ. विद्या ठोकळ यांच्या कुशल नेतृत्वाखाली करण्यात आले.यावेळी नर्सिंग कॉलेज चे स्वाती सूर्यवंशी,चित्रा नेरुरकर,एंजल साळवे,शर्लिन माडगुळे,प्रियांका वारे, एस्थर टेलडुने व अश्विनी पाटोळे तसेच इतर सर्व विभाग सदस्य आदींनी मोलाचे सहकार्य केले.

(पान १ वरून)

## अभिषेक कळमकरचे आणखी एक कांड समोर

व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली. तसेच, जीवे मारण्याची भीतीही दाखविण्यात आल्याने पीडिता दीर्घकाळ गप्प राहिली. मात्र, आरोपीविरुद्ध अन्य गुन्हे दाखल झाल्याची माहिती मिळताच तिने धैर्य एकवटून पोलिसांत तक्रार दिली.

## अमेरिका-इराण यांच्यात पंधरा दिवसांचा युद्धविराम

आहे. ट्रम्प यांनी या बैठकीला ऐतिहासिक संधी असे संबोधले असून, वर्षअखेरीस शी जिनपिंग यांना वॉशिंग्टनमध्ये आमंत्रित करण्याचेही त्यांनी सांगितले. युद्धविराम जाहीर करताना ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, ईराणने होर्मुज सामुद्रधुनी खुली करण्यासही तयारी दर्शवली आहे. दिनांक १० एप्रिल रोजी इस्लामाबादमध्ये या प्रस्तावावर चर्चा होणार आहे.

## शेअर बाजार वधारला, सोने-चांदीच्या दरात उसळी

थांबल्यास सोन्याचे दर कमी होण्याची दाट शक्यता आहे.
हवाई सीमा पूर्णपणे उघडली गेली तर सोन्याचे दर कमी होऊ शकतात. सोन्याचे दर १ लाख ४५ हजार ते १ लाख ५० हजारांदरम्यान राहतील. हंगाम नव्हता, मागणी कमी होती, लग्नसराई कमी होती. परीक्षा असतात, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात मागणी कमी असते, पुरवठा जास्त असतो त्यामुळं सोन्याचे दर कमी होतात. युद्ध जर नाही थांबलं तर सोन्याचे दर वाढू शकतात, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

## मनपाच्या दोन सत्रातील साफसफाई निर्णयाविरोधात कर्मचाऱ्यांचा एल्गार

करून घेणे त्यांच्या आरोग्यास घातक ठरू शकते. उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने प्रशासनाचा निर्णय हा कामगारांच्या जीविताशी खेळ करणारा असल्याचा गंभीर आरोप युनियनने केला आहे.
दरम्यान, यापूर्वी युनियनच्या शिष्टमंडळाने वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून अडचणी मांडल्या होत्या. उपायुक्त (कर) व अतिरिक्त आयुक्त यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणताही अंतिम निर्णय न झाल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.
महानगरपालिका प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून एकाच सत्रात साफसफाईचे कामकाज सुरू ठेवण्याचा निर्णय घ्यावा, अन्यथा ९ एप्रिलपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल आणि त्यातून उद्भवणाऱ्या परिणामांना सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा मनपा कर्मचारी युनियनकडून देण्यात आला आहे.